# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 03.06.2024** **वारः सोमवार**

-----------------------------------------------------------------------------------

1.उष्णतेची लाट आणि रेमल चक्रीवादळानंतरच्या पारिस्थितीचा पंतप्रधानांद्वारे आढावा, लोकसभा तसंच आंध्र प्रदेश आणि ओडिशा विधानसभा निवडणुकीची उद्या मतमोजणी

2.देशात यूपीआयद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक व्यवहारांच्या संख्येचा गेल्या महिन्यात नवा उच्चांक

3.७७ व्या जागतिक आरोग्य सभेची, आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमावलीतील सुधारणेला मंजूरी आणि

4.दिल्लीसह वायव्य भारतात कमाल तापमानात घट

**<u>पंप्र-बैठकाप</u>**

उष्णतेची लाट आणि रेमल चक्रीवादळानंतरच्या पारिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिल्लीत बैठका घेतल्या. या बैठकीत त्यांना चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या राज्यांची माहिती देण्यात आली. मिझोराम, आसाम, मणिपूर, मेघालय आणि त्रिपुरा मध्ये भूस्खलन तसंच पुरामुळे झालेली जीवितहानी आणि घरं आणि मालमत्तेचं नुकसान यावरही यावेळी चर्चा झाली. चक्रीवादळाचा फटका बसलेल्या राज्यांना सरकार पूर्ण मदत सुरूच ठेवणार असल्याचं पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं. त्यांनी गृह मंत्रालयाला परिस्थितीवर लक्ष ठेवण्याच्या आणि पुनर्वसनासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी, या प्रकरणाचा आढावा घेण्याच्या सूचना दिल्या.

पंतप्रधानांनी देशातल्या उष्णतेच्या लाटेशी संबंधित परिस्थितीचा आढावा घेण्यासाठीही एक बैठक घेतली. यावेळी त्यांना भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशच्या काही भागात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता असल्याची माहिती देण्यात आली. या वर्षी, देशात मान्सून सरासरी इतका राहण्याची शक्यता असून बहुतांश भागात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आगीच्या घटना रोखण्यासाठी नियमित सराव करण्याची आवश्यकता असल्याचं पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं. आग प्रतिबंधक आणि वीज सुरक्षा तपासणी नियमित पणे करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी पंतप्रधानाना जंगलात लागणारी आग ओळखण्यासाठी आणि त्याच्या नियंत्रणासाठी असलेल्या पोर्टल वन अग्निच्या उपयुक्ततेविषयी माहिती देण्यात आली.

**<u>NTमोजणीमतेप</u>**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या होणार असून, आंध्र प्रदेश आणि ओडिशामधील विधानसभा निवडणुकीची आणि विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी उद्याच होत आहेत. सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. मतमोजणीचे कल आणि निकाल निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर results.eci.gov.in वर तसेच व्होटर हेल्पलाइन ॲपवर उपलब्ध असतील असं निवडणूक आयोगाने सांगितलं आहे.
गुगल प्ले स्टोअर किंवा ॲपल प्ले स्टोअर वरून ही व्होटर हेल्पलाइन डाउनलोड करता येणार आहे.
आयोगाने मतमोजणीसाठीचे निरीक्षक अधिकारी आणि मतमोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी एक पुस्तिका जारी केली असून ती आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मतमोजणी व्यवस्था, मतमोजणीची प्रक्रिया आणि ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी संदर्भातल्या सर्वसमावेशक सूचना संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.
लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी प्रादेशिक वृत्त विभागाकडून निवाडा जनतेचा हा विशेष कार्यक्रम सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजे दरम्यान प्रसारित केला जाणार आहे.

**<u>सिक्कीम</u>**

लोकसभेसोबत दोन राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकींमध्ये, अरुणाचल प्रदेशात भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालं असून सिक्कीममध्ये, सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाला एकतर्फी विजय मिळाला आहे. अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत 60 पैकी 46 जागांवर भाजपानं विजय मिळवला असून 46 पैकी 10 जागांवर भाजपाचे उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तीन आमदार इथं निवडून आले आहेत.
सिक्कीम विधानसभा निवडणुकीत, सिक्कीम क्रांतीकारी मोर्चानं 32 पैकी 31 जागा मिळवत, एकतर्फी विजय मिळवला आहे. तर उर्वरित एक जागा सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंटला मिळाली आहे.

**<u>यूपीआय</u>**

देशातल्या यूपीआयद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक व्यवहारांच्या संख्येनं गेल्या महिन्यात नवा उच्चांक गाठला आहे. मे महिन्यात यूपीआयद्वारे २ लाख कोटींपेक्षा अधिक रकमेचे १४० लाखांहून अधिक व्यवहार झाल्याची माहिती भारतीय राष्ट्रीय देयक महामंडळानं दिली आहे. गेल्या वर्षीच्या मे महिन्याच्या तुलनेत यूपीआय व्यवहारांच्या संख्येत ४९ टक्क्यांनी तर किमतीत ३९ टक्क्यांनी वाढ नोंदवण्यात आली आहे. दरम्यान, आयएमपीएस व्यवहारात गेल्या वर्षाच्या तुलनेत संख्येत १२ टक्क्यांनी आणि रकमेत १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**<u>मेक्सिकोनिवडणूक</u>**

मेक्सिकोमधल्या निवडणूक प्राधिकरणानं तिथल्या सर्वात मोठ्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात केली आहे. मेक्सिकोमध्ये राष्ट्राध्यक्ष पदाबरोबरच १२८ संसद सदस्य, ५०० उपप्रतिनिधी, ३२ राज्यातले आमदार, १६ शे १२ महापौर आणि ९७२ स्थानिक प्रतिनिधी निवडीसाठी मतदान होणार आहे.

CDS-INS चिलीका

अग्निपथ योजनेची अंमलबजावणी ही सेना आणि राष्ट्र उभारणीत युवा शक्ति राखण्यासाठी करण्यात आलेल्या प्रमुख सुधारणांपैकी एक आहे असं सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे. ओडिशामध्ये INS चिल्कामधल्या अग्निवीरांना संबोधित करताना ते काल बोलत होते. नौदलातल्या अग्निवीर प्रशिक्षणाची पाहणी करण्यासाठी आलेल्या जनरल अनिल चौहान यांनी तिथल्या प्रशिक्षण पायाभूत सुविधांची ही पाहणी केली. यावेळी त्यांना भारतीय नौदलाच्या भविष्यातील योध्याना घडवण्यात आयएनएस चिल्काच्या असलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरी बद्दल माहिती देण्यात आली.

**आरोग्यसुरक्षा**

७७ व्या जागतिक आरोग्य सभेनं आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमावलीतील सुधारणेला काल मंजूरी दिली. कोविड साथीनंतर सदस्य देशांनी या नियमावलीत ३०० सुधारणा सुचवल्या होत्या. त्यांना मान्यता मिळणं हे जागतिक आरोग्य सुरक्षा धोरणाला मिळालेलं उल्लेखनीय यश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंतेच्या ठरणाऱ्या सार्वजनिक आरोग्य समस्येवर मात करण्यासाठीची विविध देशांची क्षमता वाढवणं आणि साथरोगांचा सामना करण्यासाठीची तयारी याबाबत या सुधारणा सुचवण्यात आल्या आहेत.
आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमावलीतील या सुधारणांचा प्रस्ताव केंद्रिय आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनी श्वेतपत्रिकेद्वारे जागतिक आरोग्य सभेत २८ मे रोजी सादर केला होता. हा प्रस्ताव सर्व सदस्य देशांनी एकमतानं मंजूर केला.

**कृत्रिमप्रज्ञा**

अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषदेनं मूलभूत अभियांत्रिकी विभागातल्या प्राध्यापकांसाठी कृत्रिम प्रज्ञा आणि विदा विज्ञान क्षेत्रातले कमी कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम आखले आहेत. दर्जा सुधारणा अभियानाच्या अंतर्गत हे प्रशिक्षण दिलं जाणार आहे.
तमिळनाडूमधल्या महाविद्यालयांमध्ये यावर्षी कृत्रिम प्रज्ञा आणि विदा विज्ञान क्षेत्रातल्या अभ्यासक्रमांना दुसऱ्या क्रमांकाची पसंती मिळत आहे. खाजगी शिक्षण संस्थांमध्ये यासाठीचे अनेक प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांमध्ये या अभ्यासक्रमांचा समावेश वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**अमूलदूधदर**

गुजरात सहकारी दूध विपणन महामंडळानं अमूल दुधाचा दर प्रतिलिटर २ रुपयांनी वाढवला आहे. ही दरवाढ आजपासून देशभरात अमलात येणार आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात महामंडळानं दूधाचे दर वाढवले होते.

**<u>मृत्यु</u>**

महाराष्ट्रात कोल्हापूर इथल्या कळंबा मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांनी केलेल्या मारहाणीत काल एकाचा खून करण्यात आला. मुन्ना उर्फ मोहम्मद अली खान असं खून झालेल्या कैद्याचं नाव असून तो १९९३च्या साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी होता. न्यायालयीन बंदी आरोपी असलेल्या पाचजणांनी त्याला मारहाण केली. त्यापैकी एकानं गटारावरचं लोखंडी झाकण मुन्नाच्या डोक्यावर मारलं, त्यात त्याचा मृत्यु झाला.

**<u>विराटकोहोली</u>**

2023 या वर्षासाठी 50 षटकांच्या क्रिकेटमधील सर्वोत्तम खेळाडू म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं विराट कोहलीचा गौरव केला आहे. 35 वर्षीय विराटनं आपल्या देदीप्यमान कामगिरीत धावांचा डोंगर उभा केला आहे. 2023 मध्ये 166 धावांची खेळी ही त्याची सर्वोत्तम कामगिरी ठरली. एकाच विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक 6 शे 73 धावा करत त्यानं सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला. याशिवाय 50 शतकं ठोकून त्यानं सचिनचा 49 शतकांचा विक्रम देखील मोडला आहे.

**<u>टेनिस</u>**

भारतीय टेनिसपटू रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन साथीदार मॅथ्यू ॲब्डेन यांनी फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. दुसऱ्या फेरीतल्या सामन्यात या जोडीनं मार्केलो झोरमन आणि ऑरलान्डो लुज या जोडीवर ७-५, ४-६, ६-४ अशा सेटसमध्ये विजय मिळवला. तिसऱ्या फेरीत भारताचा एन श्रीराम बालाजी आणि मेक्सिकोचा मार्टिनेझ या जोडीबरोबर बोपण्णा ॲब्डेन जोडीचा सामना होणार आहे.

**<u>फतवा-आयएएनएस-</u>**

जागतिक तापमानवाढीला आळा घालण्याच्या प्रयत्नांचा एक बाग म्हणून उत्तर प्रदेशातल्या लखनऊ इथल्या भारतीय इस्लाम केंद्रानं झाडं तोडू नका तसंच पीकं जाळू नका असं सांगणारा फतवा जारी केला आहे. कुराणातल्या उपदेशानुसार पर्यावरणाचं रक्षण करणं, पाणीबचत आणि कचरा कमी करणं हे मुस्लीम नागरिकांचं धार्मिक कर्तव्य आहे असं या केंद्राचे अध्यक्ष मौलाना खालीद रशीद फरंगी महाली यांनी म्हटलं आहे. मोहम्मद तारीक खान यांच्या विनंतीवरुन केंद्रानं हे स्पष्टीकरण देत फतवा जारी केला आहे.

**<u>श्रीलंकापूर</u>**

श्रीलंकेत गेल्या शनिवार रविवारी झालेल्या अतीवृष्टीमुळे आलेल्या पुरात १५ जणांचा मृत्यू झाला असून १९ हजारांपेक्षा अधिक जण बेघर झाले आहेत. राजधानी कोलंबोमध्ये ३०० मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस झाला. श्रीलंकेच्या लष्कर आणि हवाई दलाने बचावकार्य सुरू केलं आहे.

**<u>वातावरण</u>**

दिल्लीसह वायव्य भारतात कमाल तापमान आणि उष्णतेची लाट हळूहळू कमी होत असल्याचं  भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे. मात्र देशाच्या वायव्य आणि मध्य भागात तसंच ओडिशातील काही भागात आज उष्णतेची लाट जाणवेल असं भारतीय हवामान विभागाचे शास्त्रज्ञ आरके जेनामानी यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. वेस्टर्न डिस्टर्बन्सचा हवामानावर परिणाम होत असून त्यामुळे तापमान आणखी खाली येईल असंही ते म्हणाले.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.